**चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र**

**पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.**

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

१६ जुलै,२०२०

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7447744100 (PRO)

# पोलीसांसोबत पोलीस योध्दा म्हणुन सहकार्य करण्याचे चंद्रपुर पोलीस दलातर्फे आवाहन

महाराष्ट्र राज्यांतर्गत तसेच चंद्रपूर जिल्हयात कोरोना विषाणुचा (कोविड-१९) प्रादुर्भाव झपाटयाने वाढत असुन पोलीस दलातील अधिकारी व कर्मचारी हे आपले कर्तव्य बजावीत असताना त्यांचेवर गुन्हयांचा तपास, बंदोबस्त, नाकाबंदी, कॅन्टेंटमेंट झोन बंदोबस्त, कोविड केअर सेंन्टर बंदोबस्त, हॉस्पीटल येथील बंदोबस्त, बाहेर राज्यातुन व जिल्हयातुन आलेले प्रवासी यांची तपासणी सेंटर येथील बंदोबस्त व पोलीस डयुटीचा ताण आधीच असताना जिल्हयातील कोरोना बाधीत व त्याचा संपर्कात आलेल्या व्यक्तीवर विशेष लक्ष दयावे लागत आहे. तसेच स्वत:च्या कुटुंबाची सुध्दा जबाबदारी पार पाडत आहे. या सर्व बाबींचा विचार करता पोलीसांना सर्वसामान्य जनतेकडुन विशेषत: युवकांकडुन सहकार्य करण्याची गरज आहे.

याच बाबीच्या अनुषंगाने चंद्रपूर जिल्हा पोलीस दलातर्फे जिल्हयातील युवा पिढीला पोलीसांसोबत काम करुन त्यांच्यासारखे जीवनात कायदा व नियमाचे पालन करुन जीवन जगावे यासाठी ''पोलीस योध्दा'' हा एक अभिनव उपक्रम राबविण्याची योजना आहे. सदर योजने अंतर्गत समाजातील युवकांना पोलीसांबरोबर नि:स्वार्थपणे १५ दिवसांकरीता ''पोलीस योध्दा'' म्हणुन सेवा बजावुन पोलीस दलास सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. सदर ''पोलीस योध्दा'' तरुणांना चंद्रपूर जिल्हा पोलीसांकडुन त्यांनी बजाविलेल्या अमुल्य योगदानाबद्दल सन्मान प्रमाणपत्र देवुन गौरविण्यात येईल.

आवाहन :- **सामाजिक कार्यात रुची असणाऱ्या व पोलीसांच्या कार्यात मदत करु इच्छिणाऱ्या युवकांना चंद्रपूर पोलीस दलातर्फे आवाहन करण्यात येते की, कोरोनासारख्या गंभीर आपत्तीत पुढे येवुन पोलीस दलांच्या खांदयाशी खांदा लावुन पोलीसांसोबत कर्तव्य बजावुन कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महत्वाची भुमिका बजवावी.**

**पोलीस व जनता हे एकत्र येवून काम केल्यास निश्चितच सर्वत्र झपाटयाने वाढत असलेल्या कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यास यश मिळेल.**

**खालील लिंकवर आवश्यक माहिती भरुन जास्तीत जास्त संख्येनी ''पोलीस योध्दा'' उपक्रमात सहभागी व्हा .**

**https://forms.gle/SNJa2iPytqPLrkrn9**

---

# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

१६ जुलै,२०२०

☎ : 07172-264300
: 07172-255800
✍: 7447744100 (PRO)

# प्रजासत्ताक नागरी सहकारी पतसंस्था मध्ये गुंतवणुकदाराची फसवणुक करणारे आरोपी आर्थिक गुन्हे शाखेच्या जाळयात

चंद्रपुर जिल्हयात प्रजासत्ताक नागरी सहकारी पतसंस्था मर्या. बल्लारपुर, चंद्रपुर मध्ये फिर्यादी नामे प्रविण बळीराम नक्षिणे वय ५१ रा. बल्लारपुर यांची आणि इतर गुंतवणुकदाराची एकुण १,५२,००,०००/—रू ची झाल्याबाबत पोलीस स्टेशन बल्लारपुर येथे अप.क्र. ४२७/२०२० कलम ४२०, ४०९ भादंवि सहकलम ३ एमपीआयडी ॲक्ट १९९९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास मा. पोलीस अधीक्षक चंद्रपुर डॉ. श्री. महेश्वर रेडड्ी यांचे मार्गदर्शनात आर्थिक गुन्हे शाखा चंद्रपुर यांचे कडे सोपाविण्यात आला आहे.

आर्थिक गुन्हे शाखेचे पथकाने तपास कौशल्य वापरून गुन्हयातील आरोपींस निष्पन्न करून संस्थेचे अध्यक्ष आरोपी नामे १) श्रावण कांबळे आणि मॅनेजर २)प्रविण सोनबाजी नळे दोन्ही रा. बल्लारपुर यांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास आर्थिक गुन्हे शाखा करीत आहे.

सदर गुन्हयाचा तपास मा. पोलीस अधीक्षक चंद्रपुर डॉ. श्री. महेश्वर रेडड्ी, अपर पोलीस अधीक्षक श्री. प्रशांत खैरे आणि पोलीस उपअधीक्षक (गृह) श्री. शेखर देशमुख यांचे मार्गदर्शनात पोलीस निरिक्षक आर्थिक गुन्हे शाखा पोनि. श्री. प्र.के. मकेश्वर व त्यांचे सहकारी यांनी केला.

---